**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पिंपरी-चिंचवड **P.S.(ठाणे):** पिंपरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0165 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**16/04/2025 09:54

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 15/04/2025

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/04/2025

**Time From (वेळेपासून):** 16:28 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:28 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 16/04/2025 **Time (वेळ):** 09:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 011

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/04/2025 09:42 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पिंपरी पोलीस स्टेशन अंकित, मोहननगर पोलीस चौकी, पिंपरी,चिंचवड पोलीस आयुक्तालय

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.संजय दत्तु सोनटक्के

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 2001

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | डबल ट्रि हटेल,शेजारी,इंदीरानगर,चिंचवड,पुणे,पिंपरी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | डबल ट्रि हटेल,शेजारी,इंदीरानगर,चिंचवड,पुणे,पिंपरी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8600824237

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | निलेश रमेश बोकेफोडे | | | 1. फलट नं401 ,इंद्रायणी वाटीका परंडवाल,चौक जवळ ,देहुगाव, तामावळ ,जिपुणे,पिंपरी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच स्विकारलीतडजोडीअंती रुपये 30,000/ | 30,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

30,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद तारीख.16.04.2025

मी. श्री.संजय दत्तु सोनटक्के, वय-24 वर्षे,व्यवसाय-पानटपरी रा.डबल ट्रि हॉटेल शेजारी, इंदीरानगर चिंचवड,पुणे मो.नं. 8600824237 समक्ष हजर राहुन जबाब देतो की,"मी वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर माझ्या परीवारासोबत राहण्यास आहे.मी डबल ट्रि हॉटेल शेजारी पानपट्टी लावुन त्यावर माझे परीवाराचा उदरनिर्वाह करतो. माझ्या पानपट्टीमध्ये विमल गुटखा मिळुन आल्याने माझा चुलत भाऊ किशोर सोनटक्के व माझे विरुध्द पिंपरी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.1145/2024 दि.22/12/2024 रोजी दाखल आहे.सदर गुन्हयाचा तपास पीएसआय बोकेफोडे करत आहेत.या गुन्हयात मला अटकपुर्व जामीन मंजुर आहे.सदर गुन्हयात मला मदत करण्यासाठी म्हणुन व माझी टु व्हिलर गाडी सोडतो असे सांगुन पीएसआय बोकेफोडे यांनी दि.09/04/2025 रोजी माझेकडे 40,000/- रुपयाची लाच मागणी केली आहे.पीएसआय बोकेफोडे यांनी मागणी केलेली रक्कम ही लाच रक्कम असुन ती देण्याची माझी इच्छा नाही.त्यांचेत व माझेत कोणताही आर्थिक व्यवहार नाही.त्यांच्यावर कारवाई व्हावी ही विनंती."अशी तक्रार मी दि.11/04/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे पोलीस उप अधिक्षक, श्री.गावडे यांना दिली होती.त्यांनी त्यांचे दालनात पोलीस निरीक्षक निंबाळकर,लाप्रवि पुणे यांना बोलावुन सदर तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कायदेशिर कारवाई करणेबाबत निर्देश दिले होते.त्यानुसार जिल्हा परीषद ,शिक्षण विभाग पुणे यांचेकडील श्री.संतोष श्रीधर वायाळकर वय-48 वर्षे व्यवसाय नोकरी पद-वरीष्ठ सहाय्यक,शिक्षण विभाग, जिल्हा परीषद पुणे.रा.वारीवाना फेज ए1 -219 उरर्से ता.मावळ जि.पुणे. व श्री.प्रसाद राजेंद्र भदाणे वय-26 वर्षे व्यवसाय नोकरी पद-कनिष्ठ सहाय्यक,शिक्षण विभाग माध्यमिक जिल्हा परीषद पुणे.रा.502 आरती रेसीडन्सी , कळमकर मळा-1 बालेवाडी फाटा पुणे असे दोन पंच दि.11/04/2025 रोजी 16.00 वा उपलब्ध झालेनंतर मी माझी लेखी तक्रार पंचासमक्ष वाचुन दाखवली सदर ची तक्रार माझे हकिकते प्रमाणे बरोबर असल्याची खात्री करुन माझे लेखी तक्रारीवर पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या. त्यानुसार दि.11/04/2025 रोजी पीएसआय बोकेफोडे नेमणुक पिंपरी पोलीस ठाणे यांची माझेकडे लाचेची मागणी आहे अगर कसे याबाबत पडताळणी करणेचे ठरले.त्याकरीता सॅनडीस्क कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड त्यांचे वेस्टनातुन बाहेर काढुन पंचासमक्ष शासकिय व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकले.त्यानंतर माझे व पंच क्र.1 श्री.वायाळकर यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 17.05 वा ची होती.त्यानंतर लोकसेवक श्री.बोकेफोडे पोलीस उप निरीक्षक यांचा मला माझे मोबाईल क्रमांक वर फोन येऊन गेल्याने माझे मोबाईल.क्र.8600824237. वरुन लोकसेवक श्री. बोकेफोडे यांचे मोबाईल क्रमांक 8208000782 वर संपर्क करुन सदर फोन कॉल शासकिय व्हाईस रेकॉर्डवर ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरले.त्यानंतर 17.20 वा मी माझे मोबाईल वरुन पीएसआय बोकेफोडे यांचे मोबाईल वर कॉल केला असता त्यांनी मला भेटायला बोलावल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर पीएसआय बोकेफोडे यांचेकडे पडताळणीकामी माझेकडे शासकिय व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन पँट चे आत सेफटी पिन च्या सहायाने लावुन देऊन शासकिय पंच क्र.1 श्री.वायाळकर यांचेसह पिपंरी पोलीस ठाणे येथे 17.36 वा.पाठवले असता सदर पडताळणी वेळी मी पंचासह पीएसआय बोकेफोडे यांची भेट घेतली असता मी पीएसआय बोकेफोडे यांना "मला तेवढ गाडीची मदत करा ना सर" असे बोललो असता "तेच करायचय रे पण तु वेगळच करत बसतो" असे बोलले त्यानंतर मी त्यांना, "तुम्ही आता माझ्याकड बघा तीस चाळीस हजार कुठुन करणार साहेब थोड कमी जास्त करा.असे बाललो

असता पीएसआय बोकेफोडे यांनी “करतो ना म्हणल”असे बोलुन मला दि.12/04/2025 रोजी भेटण्यास बोलावलेने मी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो ती वेळ 20.42 वा ची होती. त्यानुसार दि. 11/04/2025 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात येऊन पुढील कारवाई दि.12/04/2025 रोजी करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानुसार दि.12/04/2025 रोजी पी.एस.आय बोकेफोडे यांची माझेकडे लाचेची मागणी आहे अगर कसे याबाबत पुन्हा पडताळणी करणेचे ठरवुन माझेकडे शासकिय व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन पँटचे आतमध्ये कोणास दिसणार नाही असा लावुन देऊन शासकिय पंच क्र.1 श्री.वायाळकर यांचेसह पिंपरी पोलीस ठाणे येथे 11.53 वा.पाठवले असता मी पीएसआय बोकेफोडे यांची पंचासमक्ष भेट घेतली त्यावेळी त्यांचे व माझे मध्ये कामासंबंधात चर्चा झाली. सदर चर्चे दरम्यान पीएसआय बोकेफोडे यांनी माझा मोबाईल काढुन माझे सोबत असणारे पंचांकडे देणेस सांगितला व उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासुन हाताच्या इशा-याने पैशाची विचारणा केली असता मी गावाकड चाललोय .. गावाकडुन यायला पाच सहा दिवस लागतील असे सांगुन मी त्यांना “किती काय करायचे? तुम्ही लय सांगतात” असे विचारले असता त्यांनी “सांगितलय कि तुला” असे बोलले असता मी , “तुम्ही बोला की किती?” असे विचारले असता त्यांनी “चाळीस” असे बोलले त्यावर मी त्यांना “चाळीस हजार”? असे विचारले असता ते “हं” असे बोलले. त्यावर मी “तेवढ नाही होत .. लय होतेत सर...आरजमेंन्ट करतोय मी थोडीशी.” असे बोललो असता त्यावर ते “पस्तीस” असे बोलले त्यावर मी “पस्तीस?”असे विचारले असता त्यांनी “हं” असे बोलले. त्यावर मी “तेवढ नाही.” “तेवढ नाही लय होतय सर.. वीस –पंचवीस हजार करतो” असे बोललो त्यावर पी.एस.आय बोकेफोडे हे “तीस कर ना” असे म्हणाले त्यावर मी “तीस झाल्यावर, तीस करतो” असे म्हणालो असता “बर ये लवकर” असे म्हणुन पी.एस.आय बोकेफोडे यांनी माझेकडे माझे विरुध्द दाखल गुन्हयात मला मदत करण्यासाठी म्हणुन व माझी टु व्हिलर गाडी सोडणेसाठी म्हणुन 40,000/- रुपयाची मागणी करुन तडजोडीअंती 30,000/- रुपयाची मागणी केली.त्यानंतर मी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 12.40 वा परत आलो.त्यानंतर सापळा कारवाईसाठी पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी मला लाच रक्कम हजर करणेबाबत विचारणा केली असता त्यावेळी मी त्यांना माझे कडे लाच रक्कम उपलब्ध नसल्याचे सांगितले.तसेच मी पी.एस.आय बोकेफोडे यांना मला पैशाची जुळवाजुळव करणेसाठी पाच- सहा दिवसाचा वेळ लागणार असल्याचे सांगितले आहे.त्यामुळे माझेकडे पैसे जुळवाजुळव झाल्यावर मी पोनि निंबाळकर यांना संपर्क करेल त्यावेळी आपण पुढील कारवाई करु आज रोजीची कारवाई स्थगित करण्यात यावी असे सांगितलेने दि.12/04/2025 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली.सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.दि.15/04/2025 रोजी पी.एस.आय बोकेफोडे यांनी माझेशी संपर्क करुन मला भेटायला बोलावलेने व माझेकडे लाच रकमेची जुळवाजुळव झालेने मी पोलीस निरीक्षक निंबाळकर यांना संपर्क साधला असता त्यांनी लागलीच सापळा कारवाई करण्याचे ठरवुन दोन पंचासमक्ष मला पी.एस.आय बोकेफोडे यांनी लाच मागणी केलेप्रमाणे त्यांना देणेकरीता लाच रक्कम हजर करण्यास सांगितले.त्यावेळी मी माझ्या बचतीमधुन 30,000/- रुपये पोनि निंबाळकर यांचे समक्ष हजर केले.पोनि निंबाळकर यांचे सुचनेनुसार मपोहवा 7901 गोरे यांनी दोन्ही पंच व मला अँन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचे उपयोग व गुणधर्म समजावुन सांगितले व मी हजर केलेल्या 500 रुपये दराच्या भारतीय चलनातील 60 नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन त्या नोटांना अँन्थ्रासीन पावडर लाऊन सदर नोटा मपोहवा गोरे यांनी माझे पँटचे उजव्या बाजुच्या खिशात ठेवल्या व पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी योग्य त्या सुचना दिल्या व पी.एस.आय बोकेफोडे यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर हाताचा अंगठा दाखवुन लाच रक्कम स्विकारलेबाबत इशारा करावा असे सांगितले त्यानंतर मी सांगितले की,सापळा कारवाईस जाणेपुर्वी मी पी.एस.आय बोकेफोडे यांना फोन करतो त्यामुळे सदरचा फोन कॉल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवले.त्यानंतर मी माझे मोबाईल वरुन पी.एस.आय बोकेफोडे यांचे मोबाईल वर कॉल केला असता सदर संभाषणा दरम्यान मी पी.एस.आय बोकेफोडे यांना आले का तुम्ही चौकीत असे विचारले असता त्यांनी मोहननगर चौकीला ये असे सांगितले ती वेळ 16.04 वा ची होती.त्यानंतर पी.एस.आय बोकेफोडे यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता मला शासकिय व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन टि शर्ट चे आत बनियनला लावुन देऊन शासकिय पंच क्र.1 श्री.वायाळकर यांचेसह नाशिक फाटा ब्रिज जवळुन मोहननगर पोलीस चौकी येथे जाणेसाठी 16.08 वा चे सुमारास माझी दुचाकी अँक्टीवा क्र.एम एच 14 जे.वाय 3118 ने रवाना केले व आमचे पाठोपाठ पोनि निंबाळकर व उर्वरीत सापळा पथक रवाना झाले. 16.20 वा चे सुमारास आम्ही मोहन नगर चौकी शेजारी पोहोचलो चौकीच्या बाहेर गाडी लाऊन चौकी मध्ये जाऊन मी व पंच क्र.01 वायाळकर यांचेसह पी.एस.आय बोकेफोडे यांची भेट घेतली असता त्यावेळी मी पी.एस.आय बोकेफोडे यांना “माझी गाडी कधी भेटल सर” अशी विचारणा केली असता त्यांनी माझेकडे लाच रकमेबाबत चौकशी करुन “किती ये.. किती ये”असे विचारले असता मी त्यांना “तीस हजार रुपयेत” असे सांगितले असता त्यांनी मला “हां देना” असे म्हणुन माझकडे लाच रकमेची मागणी

केली असता मी माझे नेसत्या पँटच्या उजव्या खिशामध्ये असलेली 30,000/- रुपये लाच रक्कम माझ्या उजव्या हाताने काढुन त्यांचे समोर धरली असत्या पी.एस.आय बोकेफोडे यांनी लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांनी परीधान केलेल्या खाकी पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशामध्ये ठेवली व त्यानंतर मी लाच स्विकारलेचा पुर्व नियोजित इशारा केला असता पोनि निंबाळकर व पथक चौकीत आले व  पोनि निंबाळकर यांनी माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 16.28 वा ची होती.त्यानंतर पी.एस.आय बोकेफोडे यांना पोनि निंबाळकर ला.प्र.वि पुणे यांनी व पथकाने ताब्यात घेतले.पीएसआय बोकेफोडे यांना त्यांनी स्विकारलेली लाच रक्कम पंचासमक्ष काढुन देणेस सांगितले असता त्यांनी परीधान  केलेल्या खाकी रंगाच्या पँट चे पुढील बाजुचे उजव्या बाजुच्या खिशातुन लाच रक्कम रुपये 30,000/- काढुन दिली.त्यानंतर पोनि निंबाळकर यांनी पंच क्र.02 श्री.भदाणे यांना पीएसआय बोकेफोडे यांनी काढुन दिलेल्या लाच रकमेतील नोटांचे नंबर आणि पंच क्र.02 श्री.भदाणे यांचे जवळील सापळा पुर्व कारवाई दरम्यानचे नोटांचे नंबर लिहुन दिलेल्या कागदावरील नंबर हे एकच आहेत का याबाबत खात्री करण्यास सांगितले.त्याप्रमाणे पंच क्र.02 श्री.भदाणे यांनी नोटांचे नंबर त्यांचेकडील कागदावर लिहीलेल्या नंबरशी पडताळुन पाहीले असता ते तंतोतंत जुळुन आले.त्यानंतर चौकीमध्ये लाईट बंद करुन कृत्रीम अंधारामध्ये पी.एस. आय बोकेफोडे यांचेकडुन हस्तगत केलेली लाच रक्कम व त्यांचे दोन्ही हात तसेच त्यांनी परीधान केलेल्या खाकी रंगाच्या पँट चे पुढील उजव्या बाजुस असणा-या खिशाचे अल्ट्रा व्हायलेट दिव्याच्या प्रकाशामध्ये दोन्ही पंचासमक्ष तपासणी केली असता पीएसआय बोकेफोडे यांचे दोन्ही हातास पुढील बाजुस ,बोटांच्या पे-यावर, लाच रकमेवर तसेच परीधान केलेल्या खाकी रंगाचे पँटचे पुढील बाजुचे उजव्या खिशास अन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली.सदर वेळी व्हीडीओ चित्रीकरण करण्यात आलेले असुन सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे. तरी दि.11/04/2025 रोजी मी दिलेल्या तक्रारीवरुन दि.11/04/2025 रोजी व दि.12/04/2025 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान पिंपरी पोलीस स्टेशन येथील पी.एस.आय निलेश रमेश बोकेफोडे यांनी माझे विरुध्द पिंपरी पोलीस ठाणे येथे दाखल गुन्हयात मला मदत करण्यासाठी म्हणुन व माझी टु व्हिलर गाडी सोडणेसाठी म्हणुन 40,000/- रुपयाची लाच मागणी करुन तडजोडीअंती 30,000/- रुपयाची लाच मागणी करुन दि.15/04/2025 रोजी पंचासमक्ष 30,000/- रुपये लाच रक्कम स्विकारली.म्हणुन माझी श्री निलेश रमेश बोकेफोडे ,पोलीस उप निरीक्षक पिंपरी पोलीस स्टेशन यांचेविरुध्द फिर्याद आहे.  माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून  पाहीला असून बरोबर आहे.

13. **Action taken:  Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation: (**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

Ashok  Narayan  Kadlag(I (Inspector)) / PI **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**)  or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Ashok Narayan Kac

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**